महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539170, 173
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
M.D. (Ayurved)
**Director, Student Welfare**

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/ ८९ /२०२३ दि. ०६ /०९/२०२३

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य
संगम सेवाभावी ट्रस्ट संचलित आयुर्वेद
महाविद्यालय, पुणे - नाशिक हायवे, बँक ऑफ महाराष्ट्र,
गुंजाळवाडी शाळेच्या पाठीमागे, गुंजाळवाडी
ता. संगमनेर, जि अहमदनगर - ४२२६०५

विषय : कमवा व शिका योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....
संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/६८२/२०२२ दि.०१/०६/२०२२

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विद्यापीठाने लागू केलेली कमवा व शिका योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी, शर्ती व निकषांनुसार योजनेचे अनुदान, प्रति विद्यार्थी रु.१६,०००/- इतकी रक्कम मिळणेसाठी खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरले आहेत. **यापूर्वी संदर्भीय परिपत्रकानूसार पाठविण्यात आलेल्या व नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, महाविद्यालयाने सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी फक्त दोनच तास निवडक स्वरुपाची कामे विद्यार्थ्यांना देण्यात यावी,** व त्या मोबदल्यात विद्यापीठांतर्फे रु. ५०/- प्रती तास या दराने मेहनताना अदा करण्यात यावा. त्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे ..०५.. विद्यार्थ्यांकरीता व ऑडीट फी रु. ५००/- असे विद्यापीठाचे एकत्रित अनुदान म्हणून रु. ८०,५००.../- इतकी महाविद्यालयाच्या बचत खात्यात दि. ०८ / ०९ /२०२३ रोजी आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थी :
१) जगताप प्रतिक प्रकाश
२) वाळरे किरण बाळासाहेब
३) सायकर रुपाली दशरथ
४) आरोटे सुदर्शन बाकु
५) शेख अमिर आवेद

स. एस. टी. आयुर्वेद महाविद्यालय
संगमनेर

अ) **कमवा व शिका योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१) **योजनेअंतर्गत** महाविद्यालयाने **विद्यार्थ्यास** सोपविण्यात **आलेल्या कामाचा** उल्लेख **करुन** " **कमवा व** शिका योजनेकरीता ......................(**विद्यार्थ्याचे नाव**) ..................या **आर्थिक दृष्टया** मागासलेल्या **गरीब** विद्यार्थ्यास **काम देण्यात** आले **आहे". असे अधिष्ठाता/प्राचार्य** यांचे प्रमाणपत्र.

२) योजना **समन्वयक**, अधिष्ठाता/**प्राचार्य यांनी** स्वाक्षरी **केलेली कमवा** व शिका **योजनेतील** विद्यार्थ्यांची **दरमहा** हजेरीपत्रकाची **मुळ प्रत**. ( Original Copy)

३) योजनेत **काम** केलेल्या विद्यार्थ्यांना, **विद्यापीठाच्या** अनुदानातून **देण्यात** आलेल्या **रक्कमेच्या** धनाकर्ष **अथवा** धनादेशाच्या छायांकीत **प्रती**

४) धनादेश **वटवलेल्या** विद्यार्थ्यांच्या **बॅंक पासबुकची** छायांकीत **प्रती**

५) सनदी **लेखापालांकडून** परिक्षण केलेला **रक्कमेचा** जमाखर्चाचा **हिशोब मुळ** प्रत.(Original Copy)

६) सोबत **जोडलेल्या** विहित नमुन्यामध्ये, **सनदी** लेखापालांचे **उपयोगिता** प्रमाणपत्र **मुळ प्रत**. ( Utilisation Certificate ) ( Original Copy)

७) योजनेतंर्गत **दिलेल्या**, अनुदान **रक्कमेच्या हिशोबाचे** समायोजन **करण्यासाठी** वर नमुद केलेल्या **सर्व** कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन, सदर पत्राच्या **दिनांकापासुन**, (उन्हाळी सुट्टी, हिवाळी सुट्टी वगळून किंवा विद्यार्थ्यास अपरिहार्य कारणामुळे, अपघात झाला किंवा आजारी असल्यास विद्यार्थी काम न करु शकल्यास पुढे तेवढेच सुट्टी घेतेलेले दिवस मोजुन तेवढेच दिवस काम देण्यात यावे) आठ महिने पुर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयाने रु. ५००/- ची ऑडीट फी पावती पाठवावी. **मुळ प्रत**. ( Original Copy)

योजनेअंतर्गत काम करण्यास इच्छूक नसणाऱ्या विद्यार्थ्यांची रक्कम त्वरित विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅंकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल. कमवा व शिका योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम **" कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक." यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास परत करावी.**

शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी, लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

**सदर योजनेसाठीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढील सुचना देण्यात याव्यात.**

अ) योजनेचे लाभार्थी विद्यार्थी आपल्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही.

ब) योजनेतील कामाचा महाविद्यालयात नोकरी/सेवेशी कोणताही संबंध रहाणार नाही.

क) लाभार्थी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्त व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

ड) योजनेतील लाभार्थी विद्यार्थी दरवर्षी नव्याने निश्चित केले जातील, त्यासाठी विद्यार्थ्यांने दरवर्षी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल.

इ) महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कामाबाबत/सेवेबाबत तसेच आर्थिक व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय व विद्यार्थी यांची असेल व त्याबाबत विद्यापीठाकडे तक्रार करता येणार नाही.

ई) लाभार्थी विद्यार्थ्याला महिन्यातील जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्तीत जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.५० प्रती तास प्रमाणे) कमाल रु. १६,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नोंद घ्यावी. **(रु ५०×२ तास ×२० दिवस =रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = १६,०००/-)** कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण ( Regular Monitoring ) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावयाची आहे.

तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. **सदर पत्राची प्रत संबधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी**. ही विनंती.

धन्यवाद !

संचालक
**विद्यार्थी कल्याण विभाग**

**(टिप** : सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर **दि.** १५ /१२ /२०२३ पर्यत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

**सोबत :** १) सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्राची नमुना प्रत.
२) हजेरीपत्रकाची नमुना प्रत.
३) जमा व खर्चाचा हिशोब.

**माहितीस्तव प्रत** : महाविद्यालयाने सदर पत्राच्या छायांकीत प्रती लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539170, **Phone :** 0253-2539173

**E-mail :** sw@muhs.ac.in **Web.:**www.muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे** **Dr.Manojkumar B. More**

एम.डी. (आयुर्वेद) M.D. (Ayurved)

**संचालक, विद्यार्थी कल्याण** **Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्लु/स्कीम/ ४३१ /२०२३ दिनांक: २० / ०३ /२०२३

प्रति,

अधिष्ठाता / प्राचार्य

संगम सेवाभावी ट्रस्ट संचालित आयुर्वेद

महाविद्यालय, पुणे - नाशिक हायवे, बँक ऑफ महाराष्ट्र,

कुंजाळवाडी शाखेच्या पाठीमागे, कुंजाळवाडी,

ता. संगमनेर जि. अहमदनगर - ४२२६०५

**विषय : सावित्रीबाई फुले-मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत...**

**संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/६८१/२०२२ दि.०१/०६/२०२२**

**महोदय / महोदया,**

विद्यापीठाने लागू केलेल्या सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेसाठी, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रस्ताव प्राप्त झाले. सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी व शर्तीनुसार अनुदान मिळणेसाठी खाली नमुद केलेल्या विद्यार्थीनींचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

१) शेख आफरीन नाझ - PG
२)
३)
४)
५)

सदर विद्यार्थीनींस वर्ष २०२२-२३ साठी सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या अनुदानातून **रु.२५,०००/-** इतकी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे. ही रक्कम सदर विद्यार्थीनींच्या बचत खात्यात **दि. १८/०३/२०२३ रोजी** आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर रक्कम विद्यार्थीनींच्या बचत खात्यात आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच पावती या पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरुन दि. २८/०४/२०२३ पर्यंत उलट-टपाली महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या सही व शिक्क्यानिशी विद्यापीठास पाठवावी.

TO, Gunjal Saheb

धन्यवाद !

31/3

संचालक
विद्यार्थी कल्याण

सोबत : १) विहित नमुन्यातील नमुना पावती